**CNR No.MHSI010006962017**

## निशाणी २२ खालील आदेश

अपेलंट यांनी रिस्पॉडेंट नं ०१ यांचे विरूध्द झालेला अबेटमेंट सेटअसाईड रद्द करून मागण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जावर रिस्पॉडेंट नं. २ यांनी म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे. अपेलंट व रिस्पॉडंट यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अपेलंटचे अर्जामध्ये कथन की, रिस्पॉडेंट नं. ०१ इसाक बेग उमर बेग हे दिनांक १७/०४/२०१६ रोजी अजमेर, राजस्थान येथे मरण पावलेले आहेत. ते मरण पावल्याची माहिती अपिलार्थी यांना मिळाली. परंतु कायदेशिर वारस यांची माहिती वेळेत हजर करून अर्ज दाखल करणे शक्य झाले नाही. त्यामुळे वारस दाखल करण्यास विलंब झालेला आहे. सबब वेळेत वारस अपिलामध्ये दाखल न झाल्यामुळे रिस्पॉडेंट नं. ०१ च्या विरूध्द अबेट झालेले आहे. सदर झालेला आदेश हा अपिलंट यांच्या निष्काळजीपणामुळे झालेला नसल्याने न्यायाच्या दृष्टीने तो मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. रिस्पॉडंट नं. २ यांनी अर्जावर म्हणणे दाखल करून विरोध केलेला आहे की, अर्जास योग्य व संयुक्तिक कारण नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

४. अपेलंट यांचा अर्ज, त्यावरील रिस्पॉडंट याचे म्हणणे याचा विचार करता अपेलंट यांनी रिस्पॉडेंट नं. ०१ यांचे वारस वेळेत अपिलामध्ये समाविष्ट

केलेले नाही. अपेलंट यांचे अर्जामध्ये कथन की मयता बाबत माहिती उपलब्ध झाली नव्हती त्यामुळे वेळेत वारस दाखल करता आलेले नाहीत. या कारणांचा विचार करता रिस्पॉडेंट नं. ०१ यांचे वारस अपिलाकामी आवश्यक पक्षकार आहेत. सबब रिस्पॉडेंट नं. ०१ च्या विरूध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपिलाचा अंतिम गुणदोषावर निकाल होण्यासाठी अपेलंट यांना संधी देणे योग्य व न्यायाचे होणारे आहे. त्यामुळे अपेलंट याने दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अपेलंट यांचा निशाणी २२ वरील अर्ज हा मंजूर करण्यात येत आहे.

२. रिस्पॉडेंट नं. ०१ विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येत आहे.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2025.11.12 10:40:46 +0530

सिंधुदुर्ग–ओरोस
दिनांक– १०/११/२०२५

( श्री.एस.एस.इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश
सिंधुदुर्ग–ओरोस.